2 8 MAR 2017

लोकमत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रभारी प्र-कुलगुरूपदी डी. टी. शिर्के

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विशेष कार्य अधिकारीपदी कार्यरत असलेल्या डॉ. डी. टी. शिर्के यांची सोमवारी प्रभारी प्र-कुलगुरूपदी नियुक्ती झाली. त्यांची या पदावर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी नियुक्ती केली.



नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठांमध्ये प्र-कुलगुरू हे पद असणार आहे. पूर्णवेळ प्र-कुलगुरूंची नियुक्तीस आणखी काही महिन्यांचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे शासनाच्या सूचनेनुसार विद्यापीठाने कुलगुरूंच्या अधिकारांतर्गत डॉ. शिर्के यांची 'प्रभारी प्र-कुलगुरुपदी' नियुक्ती केली. यापूर्वी विद्यापीठाने डॉ. शिर्के यांची १५ मार्चला विशेष कार्य अधिकारीपदी नियुक्ती केली होती. त्यानंतर सोमवारी त्यांची कुलगुरू डॉ. शिंदे यांनी प्रभारी प्र-कुलगुरूपदी नियुक्ती केली. डॉ. शिर्के हे संख्याशास्त्र विभागात कार्यरत आहेत. त्यांनी यापूर्वी सव्वा दोन वर्षे विद्यापीठाचे कुलसचिवपदी आणि व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, अधिसभा, आदी विविध अधिकार मंडळांवर काम केले आहे. नवीन विद्यापीठ कायद्याच्या अनुषंगाने सर्व विद्यापीठांना लागू करण्यासाठी समान परिनियम संहिता तयार करण्यासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या सदस्यपदी ते कार्यरत आहेत. (प्रतिनिधी)

28 MAR 2017 सकाळ
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे डॉ. शिर्के प्र-कुलगुरू



डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरूपदी डॉ. डी. के. शिर्के यांची निवड झाली आहे. महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सिटी ॲक्टमधील कलमानुसार ही निवड केल्याचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी 'सकाळ'ला सांगितले. नव्या कायद्याची २८ फेब्रुवारीला अंमलबजावणी सुरू झाली आहे. विशेष कार्य अधिकारी म्हणून डॉ. शिर्के यांच्याकडे पदभार दिला आहे. आता त्यांच्याकडे प्रभारी (ऑफिसिएटिंग) प्र-कुलगुरूपदाचाही पदभार दिला आहे. राज्यपालांकडून पूर्णवेळ प्र-कुलगुरूपदी नियुक्ती होईपर्यंत डॉ. शिर्के प्रभारी म्हणून काम करतील, असे डॉ. शिंदे यांनी स्पष्ट केले.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 MAR 2017
महाराष्ट्र टाईम्स

# प्रभारी प्र-कुलगुरुपदी डॉ. डी. टी. शिर्के



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरुपदी डॉ. डी. टी. शिर्के यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी त्यांना सोमवारी नियुक्तीचे पत्र दिले असून शिर्के यांनी पदाचा कार्यभार सोमवारी स्वीकारला. संख्याशास्त्र विभागात कार्यरत असलेले डॉ. शिर्के हे गेली २८ वर्षे अध्यापन क्षेत्रात आहेत. त्यांनी यापूर्वी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव म्हणून सव्वा दोन वर्षे काम केले आहे.

त्यांनी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर (२०१० ते २०१५) पाच वर्षे प्रतिनिधित्व केले आहे. विद्यापीठाच्या वित्तसह अनेक कमिट्यावर काम करण्याचा अनुभव आहे. तत्कालिन कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या कालावधीत २००६ ते २०१० या कालावधीत तीन टप्प्यांत त्यांनी सव्वा दोन वर्षे कुलसचिव म्हणून ठसा उमटविला. विद्यापीठातील संख्याशास्त्र विभागाचे नऊ वर्षे विभागप्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. त्यांनी सिनेट सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे.

2 8 MAR 2017 Times of India

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# DoT to get ₹50L for development

**Kolhapur:** The Department of Technology of the Shivaji University, Kolhapur (SUK) will get Rs 50 lakh of infrastructure funds from the universities 2017-18 budget.

An announcement regarding the same was made in the budget produced in the university on Friday, last week. The School of Nano science department too will receive the fund of Rs 40 lakh for its development. An SUK official said, "The funds will pave the way to develop better facilities in the universities.

CAMPUS BUZZ

**Data analysis workshop at SUK:** The Department of Computer Science of the Shivaji University, Kolhapur (SUK) will be organising a two-day workshop on big data analytics with Hadoop on April 5 and 6 within the campus premises.

According to the SUK officials, the department of computer science at SUK in association with the C-DAC Pune are organising the data workshop event.

An SUK official said, "The workshop will enable the participants to get insights and understanding of the data analysis cycle through well-defined hands-on sessions.

He added, "The online registration for the workshop have started from March 27. Students can register at the university's website. The registration fee for the event has been kept at Rs 500."

TOI



Laxmisen handing over the cheque to SUK VC Shinde

**Laxmisen Swamy donates ₹1 lakh to SUK:** Head of the Jain Maths academy in the city, Laxmisen Swamy donated Rs 1 lakh to the Shivaji University, Kolhapur (SUK) at Bhagwan Mahavir study centre on Friday. The vice chancellor of SUK, Devanand Shinde on the occasion said, "Laxmisen Mahaswamy is aware of the academic happenings in the university. It is an honour to receive funds from him . The funds will be used for the welfare of thefinancially weak students."